ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-VI April 2013

# मुंबईतील डॉ. भाऊदाजी लाड वस्तुसंग्रहालय : एक अभ्यास

प्रा. प्रधान रामकुमार,
सहाय्यक प्राध्यापक,
एस्. एन्. डी. टी. कला व एस. बी. बी. वाणिज्य,
आणि विज्ञान महिला महाविद्यालय,
मुंबई – 20.

*सारांश :*

*डॉ. भाऊदाजी लाड वस्तुसंग्रहालयातील पुराण वस्तु पासून नवनविन कला तसेच मुंबईचा भारतातील पाश्चिमात्य काळातील आणि जगाच्या इतिहासाची माहिती मिळते. अनेक प्रातातील राजे महाराजांच्या काळातील कला वस्तु त्यांनी निर्माण केलेल्या धातुच्या वस्तु यांची माहिती मिळते.*

**मुख्य संज्ञा :** डॉ. भाऊदाजी लाड वस्तुसंग्रहालय.

**प्रस्तावना :**

डॉ. भाऊदाजी लाड वस्तुसंग्रहालय हे मुंबईतील सर्वात जुने संग्रहालय होय. 19 व्या भातकातील मुंबईमधील जनजीवन आणि औद्योगिक कलाकृती केल्या आहेत. लंडन येथे 1857 मध्ये भरलेल्या द ग्रेट एक्झिबिशनसाठी पाठविलेल्या वस्तुंच्या प्रतिकृती येथील संग्रहात पूर्वी प्रदर्शित केल्या होत्या. सुरवातीच्या काळात हा संग्रह टाऊन हॉलच्या बराकीत माडला होता. 1857 मध्ये आम जनतेसाठी तो खुला करण्यात आला. सर जॉर्ज बर्डवुड हे या संग्रहालयाचे पहिले व्यवस्थापक होते. 1878 मध्ये या संग्रहाच्या प्रदर्शनासाठी भव्यवास्तु उभारण्याच्या उददेशाने सार्वजनिक निधी उभारण्यात आला. 2 मे 1872 रोजी नव्या वास्तुमधील हे वस्तुसंग्रहालय जनतेसाठी खुले झाले. या संग्रहालयाचे तेव्हाचे नाव व्हिक्टोरिया ॲन्ड अल्बर्ट म्युझिअम असे होते. 1957 साली या संग्रहालयाचे डॉ. भाऊदाजी लाड असे नामकरण करण्यात आले. फेब्रुवारी 2003 मध्ये बृहमुंबई महानगर पालिका, इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट ॲन्ड कल्चरल आणि जमनालाल बजाज प्रतिष्ठान ता तिन संस्थांनी एकत्र येऊन विपन्नावस्थेत असलेल्या डॉ. भाऊदाजी लाड वस्तुसंग्रहालयाचे पुनरुज्जीवन करुन ते पुन्हा सुस्थीत करण्यासाठी करार केला. एखाद्या सांस्कृतिक संस्थेच्या व्यवस्थापनासाठी खाजगी संस्था, भासकीय संस्था प्रथमच एकत्र आले असावेत.

**डॉ. भाऊदाजी लाड वस्तुसंग्रहालय पुर्नथापना :**

वस्तुसंग्रहायातील कलाकुसरीचे काम धुसळ झाले होते, नक्षीकामाची हानी झाली होती,

भिंतीचे खांब निखळले होते, तावदाने तुटली होती. वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचा इतिहास आणि वैशिष्टे स्पष्ट करणारी साधने नश्ट होण्याच्या मार्गावर होती. एकंदर इमारत आणि वस्तुसंग्रहालय मोडकळीस आल्याने पुर्नस्थापना करण्यात आली.

**नवी मांडणी आणि विविध दालन :**

इमारतीची पुर्नस्थापना करतांना मुळचे रंग आणि वास्तुची भव्यता जपली गेली आहे. जागेचे नियोजन काळजीपूर्वक केल्यामुळे दुर्लक्षित राहिलेल्या भागाचाही जास्तीत जास्त प्रमाणात वापर होवून नवी दालन निर्माण झाली आहेत. या दालनासाठी अत्याधुनिक साधनांचा वापर करुन प्रकाश योजना केली आहे. मुंबई बेटांमधून एक विशाल महानगरी आकार घेत असतांना 19 व्या भातकातील काही घडामोडी आणि व्यक्ति यांनी दिलेले योगदान यातून स्पष्ट होते.

या वस्तुसंग्रहालयात जुन्या वस्तुच्या जतनीकरणासाठी जतनीकरण प्रयोगशाळा आणि दस्ताऐवजीकरण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. आतापर्यंत इन्टॅक जतनीकरण तज्ञांनी संग्रहालयातील 3500 वस्तु पुर्नस्थापित केल्या आहेत.

**औद्योगिक कला दालन आणि 19 व्या भातकातील पेंटिंग्ज :**

भारतीय रचनाबंध आणि कारागिर यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी होती. मोठया प्रदर्शनामधून भारतीय बनावटीच्या वस्तु खरेदी करणे हे युरोपीयन लोकांसाठी आधुनिकतेचे लक्षण मानले जावू लागले. त्यामुळे भारतीय औद्योगिक कला आणि पेंटिग्ज यांच्या विकासाला उत्तेजन मिळाले. स्थानिक परंपरामध्ये युरोपीयनानी थोडेफार बदल केले.

**कमल नयनबजाज मुंबई दालन आणि पूर्वीची मुंबई दालन :**

मुंबई हे ठिकाण पाणथळ व लहान खाडीने वेगळे केलेल्या माडांच्या झाडाने आच्छादलेला, खुप टेकडयांनी वेढलेला 7 लहान बेटांचा प्रदेश होता. या दालनात पूर्वीची मुंबई आणि 18 व्या व 20 व्या भातकात टप्प्याटप्प्याने झालेला बदल व विकास यांची माहीती मिळते.

**कागद लगद्याची कलाकृती :**

19 व्या भातकाच्या उत्तरार्धात व 20 व्या भातकाच्या पुर्वाधात काश्मिर पारंपारिक पध्दतीने केल्या जाणा—या कागद लगद्याच्या कलाकृतीसाठी टाकावू कागद पाण्यात बरेच दिवस भिजत घालतात. लगद्यातील अतिरीक्त पाणी काढून टाकतात व त्यात कापडाचे तुकडे, भात, गवत, कॉफी

यांचे एकत्र लगदा तयार करुन त्याचे मिश्रण साच्यात दाबून 2 ते 3 दिवस सुकवण्यासाठी ठेवले जाते. हा लगदा पुरेसा वाळल्यानंतर साच्यातून कापून काढला जातो. नंतर ते दोन्ही भाग पुन्हा चिटकवले जातात. पृष्ठभागाला डिंक व जिप्सम यांचा गिलावा चढवला जातो आणि नंतर दगडाने किंवा

भाजलेल्या मातीच्या तुकडयाने गुळगुळीत करुन त्यावर भोशकागदाचे थर देवून लाखेचा मुलामा दिला जातो. ही कलाकृती अतिशय शोभनिय आहे.

**दगडाचे कोरीव काम :**

19 व्या भातकाच्या उत्तरार्धात व 20 व्या भातकाच्या पूर्वाधात दगडाचा अनावश्यक भाग जाड लांब आणि बोथड छिन्निच्या सहाय्याने काढून दगडाला चांगला आकार दिला जातो. पेन्सिलच्या सहाय्याने नक्षी काढून छिद्रणी या सारखी हत्यारे वापरली जातात. चकाकी देण्यासाठी दाणेदार ॲल्युमिनिअम पावडर व लाखेचा वापर करतात. भारतात प्रामुख्याने कोरीव कामासाठी संगमरवर जिप्सम आणि तैल दगडाचा वापर करतात. येथे तैल दगडावरील कलाकृती जास्त दिसतात.

**बेल मेटल :**

बेल मेटल हे सात भाग तांबे आणि दोन भाग कथिल यांच्या मिश्रणातून तयार होते. या पासून तयार होणा—या वस्तू ठोकून किंवा साचे वापरुन बनविल्या जातात.

भिश्मचार्यांनी जी योगधारणा केली ती हट्योगधारणा होय. या संग्रहालयात भिष्मचार्यांनी हट्योगधारणेत खिळयावर निजलेल्या अवस्थेत मुर्ती पहायला मिळते. तसेच खराब खिळे, पत्रे वापरुन ठोकून तयार केलेली एक स्त्री प्रतिमेची मुर्ती आहे. खिळे बनविण्याची मशीन येथे बघायला मिळते. या शिवाय ऐनॅालाईट मशिन म्हणजे माणसाने पूर्ण लक्ष आपल्या कामात लागावे म्हणून दोन्ही बाजुला दोन उंच अर्धगोल पार्ट लावले आहेत. श्री. मीनाक्षी मंदिर मदुराई येथील मंदिरांची वास्तु एका काचपेटीत ठेवलेली आहे. एका काचपेटीत शिजलेला भात, त्यात दोन मडके ठेवण्यात आले आहे व त्या मडक्याच्या मध्यभागी सोने ठेवले आहे. याचे उदिद्ष्ट म्हणजे पूर्वीचे लोक धान्याला आपली संपत्ती मानत असत. जसे धान्य वाढत तशी संपत्ती धन वाढते अशी त्यांची समजूत होती. त्यामुळे ते लोक आपले सोन्याचे दागिने किंवा मौल्यवान वस्तु ठेवत असत.

**निष्कर्ष :**

डॉ. भाऊदाजी लाड वस्तुसंग्रहालयातील पुराण वस्तु पासून नवनविन कला तसेच मुंबईचा भारतातील पाश्चिमात्यकाळातील आणि जगाच्या इतिहासाची माहिती मिळते. अनेक प्रांतातील राजे महाराजांच्या काळातील कला वस्तु त्यांनी निर्माण केलेल्या धातुच्या वस्तु यांची माहिती मिळते.

**संदर्भग्रंथ :**

1. Maharashtra State Gazetteers-Greater Bombay District
2. The Indian Express. January 2, 2008
3. en.wikipedia.org/wiki
4. www.bdlmuseum.org